दिनेश
बिल्डींग मटेरियल सप्लायर्स
खडी, क्रेशेन, वन फोर, डबर,
वॉशटेन, मुरूम, वीट, सिमेंट ब्लॉक
(सुट्ट सिमेंट मिळेल...)
मो. नं. 9271713368,
9860330587

# दैनिक आकर्षण

संपादक : विजय सांगळे




वर्ष ५ । अंक २४७ । मंगळवार ३० जून २०२६ । पाने ४ । मूल्य ₹ २ https://epaper.dainkaakarshan.com E-mail- dainikaakarshan@gmail.com RNI NO. MAHMAR/2021/84322

### आर्थिक फसवणुकीच्या गुन्ह्यात नाशिक कारागृहातून आरोपी नगरला वर्ग

# चौदा कोटींच्या फसवणूक प्रकरणी स्वप्नील शिंदेसह दोघांना अटक

### दोघांना सात दिवसांची पोलीस कोठडी । गुन्ह्यात एकूण २८ आरोपींचा समावेश

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** नगर शहरातील गाजलेल्या अंकुश चत्तर खून प्रकरणातील मुख्य आरोपी व भाजपचा माजी नगरसेवक स्वप्नील रोहिदास शिंदे (वय ४०) याच्यासह दोघांना चौदा कोटींच्या आर्थिक फसवणूक प्रकरणी नगर आर्थिक गुन्हे शाखेने अटक केली आहे. सध्या नाशिक कारागृहात असलेल्या या दोघांना आर्थिक गुन्हे शाखेने आज, मंगळवारी अटक केली असून, न्यायालयाने या दोघांनाही सात दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

दरम्यान, नगर शहरातील डॉ. अनिल आठरे यांची जमीन व्यवहारात चौदा कोटींची फसवणूक केल्या प्रकरणी स्वप्नील शिंदे याच्यासह २८जणांवर एमआयडीसी पोलीस ठाण्यात दिनांक ८ नोव्हेंबर २०२५ रोजी गुन्हा दाखल झाला होता. बावीस एकर जमिनीचा हा व्यवहार असून, याबाबत डॉ. आठरे यांनी फिर्याद दिली होती. सदरचा गुन्हा ■ पान ४ वर

**आरोपींमध्ये स्वप्नील शिंदेसह भाऊ सचिन शिंदे याचा समावेश**



सुमारे अडीच वर्षांपूर्वी पाईपलाईन रोड येथे अंकुश चत्तर या तरुणाचा पाठलाग करून सिनेस्टाईल खून झाला होता. राज्यभरात गाजलेल्या या प्रकरणात भाजपचा माजी नगरसेवक स्वप्नील शिंदे हा मुख्य सूत्रधार असल्याचे पुढे आले होते. या गुन्ह्यात शिंदेसह सुमारे बारा आरोपींना अटक करण्यात आली. स्वप्नील शिंदेवर खून तसेच मोक्काची कारवाई झाली. गेल्या अडीच वर्षांपासून त्याची रवानगी नाशिक कारागृहात करण्यात आलेली आहे. तर फसवणुकीच्या गुन्ह्यात यापूर्वी अटक केलेला अमोल जाधव हा सराईत गुन्हेगार असून, त्याने नगरमध्ये अनेकांची फसवणूक केल्याचे पोलीस तपासात पुढे आले आहे. तर फसवणूक प्रकरणात स्वप्नील शिंदेचा भाऊ सचिन शिंदे याचाही आरोपी म्हणून समावेश आहे.

# अहमदनगर मर्चंटस बँकेच्या चेअरमनपदी संजय चोपडा

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अहमदनगर मर्चंटस को-ऑप. बँकेच्या चेअरमनपदी संजय चोपडा यांची एकमताने निवड करण्यात आली आहे. या निवडीसाठी बँकेच्या संचालक मंडळाच्या सदस्यांची सभा मंगळवार दि. ३० जून २०२६ रोजी सहकारी संस्था सहायक निबंधक गणेश ओटी यांच्या अध्यक्षतेखाली झाली. चेअरमन पदासाठी संजय चोपडा यांचे नाव संचालक मोहन बरमेचा यांनी सुचविले व त्यास संचालक अनिल पोखरणा यांनी अनुमोदन दिले.



या निवडीप्रसंगी मावळते चेअरमन हस्तीमलजी मुनोत, विद्यमान व्हाईस चेअरमन अमित मुथा, संचालक अनिल पोखरणा, आनंदराम मुनोत, संजय बोरा, किशोर गांधी, सीए आयपी अजय मुथा, सीए मोहन बरमेचा, किशोर मुनोत, संजीव गांधी, सुभाष बायड, श्रीमती प्रमिलाबाई बोरा, श्रीमती मीनाताई मुनोत, विजय कोथिंबीरे, सुभाष भांड, कर्मचारी प्रतिनिधी जितेंद्र बोरा, प्रसाद गांधी, मुख्य कार्यकारी अधिकारी सुनिल पुराणिक, जॉईट सी.ई.ओ. नितिन भंडारी आदि उपस्थित होते.

संजय चोपडा हे अहिल्यानगर शहरातील प्रख्यात उद्योजक असून अ.नगर महानगरपालिकेचे माजी नगरसेवक आहेत. तसेच यापूर्वीही त्यांनी बँकेच्या चेअरमन पदाचा कार्यभार सांभाळलेला होता.

या प्रसंगी सभाध्यक्ष गणेश ओटी यांनी बँकेचे नूतन चेअरमन चोपडा यांचा सत्कार करून त्यांना त्यांच्या भावी कार्यासाठी शुभेच्छा दिल्या व बँकेची उत्तरोत्तर भरभराट होण्यासाठी त्यांनी बँकेस शुभेच्छा दिल्या. तसेच बँकेचे संस्थापक व मावळते चेअरमन हस्तीमलजी मुनोत यांच्या मार्गदर्शनाखाली संचालक मंडळाची कार्य करण्याची पद्धत चांगली आहे, असे म्हटले.

यावेळी व्हाईस चेअरमन अमित मुथा, संचालक अनिल पोखरणा, संजीव गांधी, श्रीमती मीनाताई मुनोत, संजय बोरा, विजय कोथिंबीरे ■ पान ४ वर

# श्रीगोंद्यात आलिशान कारमधून गुटख्याची वाहतूक

### २९ लाखांचा मुद्देमाल जप्त । तिघांना अटक, चारजण फरार

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेने श्रीगोंदा तालुक्यातील मुंढेकरवाडी येथे गुटख्यासह दोन कार, रोकड आणि मोबाईल असा एकूण २८ लाख ८८ हजार ३३० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून तीन आरोपींना रंगेहाथ अटक केली. त्यांचे चार साथीदार फरार आहेत.




दिनांक २९ जून रोजी एलसीबीचे पथक श्रीगोंदा पोलीस ठाण्याच्या हद्दीत पेट्रोलिंग करत असताना, मुंढेकरवाडी येथे अमोल जाधव याने विक्रीसाठी प्रतिबंधित गुटखा आणल्याची गुप्त माहिती मिळाली. पोलिसांनी तात्काळ मुंढेकरवाडीत अमोल जाधवच्या घराजवळ छापा टाकला. तेथे तीन जण एका पांढऱ्या रंगाच्या अल्कायझर कारमधून स्वीफ्ट कारमध्ये गुटख्याच्या गोण्या भरताना आढळून आले. ■ पान ४ वर

# राहुरी-शनिशिंगणापूर रेल्वेप्रश्न केंद्रस्थरावर सोडवणार - फडणवीस

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** नाशिक - पुणे हायस्पीड रेल्वे मार्ग आणि राहुरी शनिशिंगणापूर रेल्वे प्रश्नाच्या संदर्भात नाशिक, अहिल्यानगर व पुणे जिल्ह्यातील संबंधित लोकप्रतिनिधींचे शिष्टमंडळ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची बुधवार दिनांक १ जुलै रोजीच भेट घेवून त्यांच्याकडे चर्चा करणार आहे. केंद्र शासनाच्या स्तरावर पाठपुरावा करून याबाबत यशस्वी तोडगा काढण्यासाठी निश्चित प्रयत्न करण्यात येतील, असे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी विधानभवनात आयोजित बैठकीत सांगितले.



नाशिक - पुणे हायस्पीड रेल्वे मार्गाबाबत जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात आली. या बैठकीस आमदार सर्वश्री माणिकराव कोकाटे, शरद सोनवणे, बाबाजी काळे, विठ्ठल लंघे, शिवाजी आढळराव पाटील, सत्यजित तांबे, प्राजक्ता तनपुरे, अमोल खताळ, अक्षय कर्डिले उपस्थित होते. तर माजी मंत्री आमदार दिलीप वळसे पाटील यांनी दूरदृष्य प्रणाली द्वारे बैठकीत सहभाग घेतला.

मंत्री श्री विखे पाटील म्हणाले, केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्या सोबतही या रेल्वे मार्गाबाबत चर्चा करण्यात येईल. त्यासाठी संबंधित लोकप्रतिनिधींचे शिष्टमंडळही दिल्लीला जाऊन त्यांची भेट घेईल. हा रेल्वे मर्ग नाशिक, अहिल्यानगर व पुणे जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासाच्यादृष्टीने अत्यंत महत्त्वाचा आहे. या रेल्वे मार्गामुळे एक वेगवान संपर्क जोडणी पुणे ते नाशिक या दोन महानगरा दरम्यान निर्माण होईल. त्यामुळे राज्याचाही गतीने विकास होईल. पुणे नासिक हायस्पीड रेल्वे प्रकल्पाच्या बाबतीत जनतेच्या भावना विचारात घेवून या प्रश्नाबाबत सकारात्मक निर्णय व्हावा यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या ■ पान ४ वर

# केडगावात तलवार बाळगणारा जेरबंद




**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** केडगाव परिसरातील समतानगर येथे हातात तलवार व कोयता बाळगून नागरिकांमध्ये दहशत निर्माण करणाऱ्या एका सराईत इसमास कोतवाली पोलिसांनी रंगेहाथ अटक केली आहे. सोमनाथ राजेंद्र गंगतीरे (वय २७, रा. समतानगर, केडगाव, अहिल्यानगर) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे.

दिनांक २६ जून रोजी वटपौर्णिमेनिमित्त कोतवाली पोलिसांचे गुन्हे शोध पथक परिसरात पेट्रोलिंग करत असताना केडगाव देवी मंदिराच्या मागे एक इसम हातात तलवार घेऊन दहशत माजवत असल्याची माहिती पोलीस निरीक्षक नितीन देशमुख यांना मिळाली. त्यांनी पथकासह तात्काळ जाऊन संशयित सोमनाथ गंगतीरे याला ताब्यात घेतले. त्याच्या घराच्या परिसराची झडती घेतली असता, पोलिसांना एक धारदार तलवार आणि लोखंडी कोयता आढळून आला. पोलिसांनी ही शस्त्रे जप्त केली असून, ■ पान ४ वर



नेहरू मार्केट येथे ग्राउंड फ्लोअरला गाळे मिळावे या मागणीसाठी माजी नगरसेवक संजय झिंजे यांच्या नेतृत्वाखाली उपमहापौर ॲड. धनंजय जाधव यांना निवेदन देवून लक्ष वेधण्यात आले.

## उपमहापौर इम्पॅक्ट: दिल्लीगेट येथील धोकादायक डिव्हायडरवर अवघ्या काही तासांत बसवले रिफ्लेक्टर!

### उपमहापौर धनंजय जाधव यांच्या तत्परतेमुळे वाहनधारकांना मोठा दिलासा

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** दिल्लीगेट परिसरातील रस्त्यावरील डिव्हायडर (दुभाजक) गेल्या काही दिवसांपासून वाहनधारकांसाठी मोठा अपघात प्रवण क्षेत्र बनला होता. रात्रीच्या वेळी किंवा अंधारात हा डिव्हायडर नीट दिसत नसल्यामुळे गेल्या काही दिवसांपासून येथे रोज वाहने धडकून छोटे-मोठे अपघात होत होते. यामुळे नागरिकांमध्ये आणि वाहनधारकांमध्ये तीव्र संतापाचे वातावरण होते.



या समस्येची गंभीर दखल घेत आज उपमहापौर धनंजय जाधव यांनी स्वतः दिल्लीगेट परिसराला भेट देऊन या धोकादायक डिव्हायडरची प्रत्यक्ष पाहणी केली. (सोबत जोडलेल्या . मध्ये पाहणीनंतर तातडीने केलेली उपाययोजना दिसत आहे.

परिस्थितीचे गांभीर्य ओळखून उपमहापौर जाधव यांनी जागेवरूनच संबंधित महापालिका अधिकारी आणि सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना कडक शब्दात सूचना दिल्या व तात्काळ उपाययोजना करण्याचे आदेश दिले.

**असा झाला इम्पॅक्ट:**

उपमहापौरांच्या या तडाखेबंद सूचनेनंतर प्रशासन तातडीने कामाला लागले. आदेश मिळाल्यानंतर अवघ्या काही तासांच्या आतच या धोकादायक डिव्हायडरच्या सुरुवातीला एक मजबूत पोल उभारून त्यावर चमकणारे रिफ्लेक्टर (परावर्तक) बसवण्यात आले. या रिफ्लेक्टरमुळे आता रात्रीच्या वेळी दूरवरून येणाऱ्या वाहनधारकांनाही डिव्हायडर स्पष्टपणे दिसणार असून, यामुळे होणारे अपघात पूर्णपणे टळणार आहेत. उपमहापौर धनंजय जाधव यांनी दाखवलेल्या या तत्परतेबद्दल आणि प्रशासनाकडून करून घेतलेल्या गतिमान कामाबद्दल दिल्लीगेट परिसरातील नागरिक आणि वाहनधारकांकडून त्यांचे विशेष आभार मानले जात आहेत.

# सरसकट कर्जमाफी, टाकळी ढोकेश्वर आरोग्य केंद्राचे नूतनीकरण करा – आ. दाते

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पारनेर–** पावसाळी अधिवेशन २०२६ दरम्यान सन २०२६-२७ च्या पुरवणी मागण्यांवरील चर्चेत सहभागी होत पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते सरांनी शेतकरी, पशुपालक आणि ग्रामीण आरोग्य व्यवस्थेशी निगडित अनेक महत्त्वाचे प्रश्न विधानसभेत ठामपणे मांडत शासनाचे लक्ष वेधले. केवळ समस्या मांडण्यापुरते न थांबता त्यावर ठोस उपाययोजना सुचवत जनतेच्या अपेक्षांना न्याय देण्याची मागणी केली.

आमदार दाते म्हणाले राज्य सरकारने घेतलेल्या कर्जमाफीच्या निर्णयाचे स्वागत करतो मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि सहकारमंत्री यांचे अभिनंदन. मात्र, यापूर्वी कर्जमाफी मिळालेल्यांना यावेळी केवळ ५० हजार रुपयांचे प्रोत्साहनपर अनुदान देण्यासंदर्भात घेण्यात आलेल्या निर्णयाबाबत शेतकऱ्यांमध्ये नाराजी असल्याचे सभागृहाच्या निदर्शनास आणून देतो. राज्यातील सर्व पात्र शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी देण्यात यावी.



कृषी विभागाच्या पुरवणी मागण्यांवरील चर्चेत बोलताना प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये स्वयंचलित हवामान केंद्र उभारण्याच्या शासनाच्या निर्णयाचे त्यांनी स्वागत केले. पूर्वी मंडळ स्तरावरील एकाच पर्जन्यमापकावर अवलंबून राहावे लागत असल्याने अनेक गावांवर अन्याय होत होता, अवर्षण व अतिवृष्टीग्रस्त भागांना या योजनेत प्राधान्य देण्याची रास्त मागणी आहे. ठिबक सिंचन, कृषी यांत्रिकीकरण यांसारख्या योजनांचा लाभ सर्व पात्र शेतकऱ्यांना शासनाच्या योजनांचा लाभ मिळाला पाहिजे.

पशुसंवर्धन विभागाच्या योजनांवर बोलताना दुधाळ गायी-म्हैस पालन, शेळीपालन, कुक्कुटपालन यांसारख्या जोडधंद्यांच्या माध्यमातून आर्थिकदृष्ट्या दुर्बल शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढू शकते, असे सांगत अशा योजनांचा लाभ खऱ्या अर्थाने गरजू लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविण्याची आवश्यकता आहे. तसेच जिल्हा परिषदेकडून राज्य शासनाकडे वर्ग झालेल्या पशुवैद्यकीय दवाखान्यांमध्ये डॉक्टर व कर्मचाऱ्यांची मोठी कमतरता असल्याने ग्रामीण भागातील शेतकऱ्यांची गैरसोय होत असल्याचे त्यांनी सांगितले. पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी याची तातडीने दखल घेऊन रिक्त पदे भरावीत, अशी मागणी आ. दातेंनी केली.

सार्वजनिक आरोग्य विभागावरील चर्चेत आमदार दाते यांनी आपल्या मतदारसंघातील टाकळी ढोकेश्वर प्राथमिक आरोग्य केंद्राची दयनीय अवस्था सभागृहात मांडली. सुमारे २० ते २५ वर्षांपूर्वी उभारण्यात आलेल्या या इमारतीत मूलभूत सुविधांचा अभाव असून ग्रामीण नागरिकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत असल्याचे त्यांनी सांगितले. त्यामुळे या आरोग्य केंद्राचे तातडीने नूतनीकरण करून आवश्यक सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी ठाम मागणी त्यांनी केली. पुरवणी मागण्यांवरील चर्चेदरम्यान आमदार काशिनाथ दाते यांनी मांडलेल्या मुद्द्यांमधून केवळ पारनेर मतदारसंघाचाच नव्हे, तर राज्यातील शेतकरी, पशुपालक आणि ग्रामीण जनतेच्या प्रश्नांना प्रभावीपणे वाचा फोडल्याचे दिसून आले. विकास, न्याय्य लाभ आणि लोकहित यांना केंद्रस्थानी ठेवून शासनाकडून ठोस निर्णय व्हावेत, यासाठी त्यांनी सभागृहात घेतलेली भूमिका पुन्हा एकदा जनतेच्या प्रश्नांसाठी सातत्याने लढणारे लोकप्रतिनिधी म्हणून त्यांच्या नेतृत्वाची ओळख अधोरेखित करणारी ठरली असल्याचे दिसून आले.

## दै. आकर्षण निवडक

### शिक्षकांच्या प्रलंबित प्रश्नांवर खासदार श्रीकांत शिंदे यांच्याशी चर्चा



अहिल्यानगर - जिल्ह्यातील शिक्षकांच्या विविध प्रलंबित प्रश्नांना न्याय मिळवून देण्यासाठी शिक्षक सेना, अहिल्यानगरच्या वतीने खासदार श्रीकांत एकनाथ शिंदे यांची भेट घेण्यात आली. शिक्षक सेनेचे जिल्हाध्यक्ष प्रसाद शिंदे यांनी खासदार शिंदे यांचे शनिशिंगणापूर येथे स्वागत करून शिक्षकांच्या विविध समस्या, प्रलंबित मागण्या आणि शिक्षण क्षेत्राशी संबंधित महत्त्वाच्या विषयांवर सविस्तर चर्चा केली. या भेटीदरम्यान जिल्ह्यातील प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षकांना भेडसावणाऱ्या विविध प्रशासकीय अडचणी खासदारांच्या निदर्शनास आणून देण्यात आल्या. शिक्षकांकडून शैक्षणिक कामांव्यतिरिक्त सातत्याने विविध अशैक्षणिक जबाबदाऱ्या सोपविल्या जात असल्याने विद्यार्थ्यांच्या अध्यापनावर परिणाम होत असल्याची बाब शिक्षक सेनेच्या वतीने मांडण्यात आली. शिक्षकांना केवळ अध्यापन आणि विद्यार्थ्यांच्या गुणवत्तावाढीवर लक्ष केंद्रित करता यावे, यासाठी अशैक्षणिक कामांचा भार कमी करण्याची आवश्यकता अधोरेखित करण्यात आली. याशिवाय शिक्षकांच्या विविध प्रलंबित मागण्या, सेवाविषयक अडचणी, पदोन्नती, वेतनाशी संबंधित प्रश्न, रिक्त पदे भरण्याची गरज तसेच शिक्षण व्यवस्थेची गुणवत्ता उंचावण्यासाठी आवश्यक उपाययोजनांबाबतही सविस्तर चर्चा झाली. विद्यार्थ्यांना दर्जेदार आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळण्यासाठी शिक्षकांना आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याबाबतही यावेळी आग्रह धरण्यात आला. खासदार श्रीकांत शिंदे यांनी शिक्षकांच्या समस्या गांभीर्याने ऐकून घेत सकारात्मक भूमिका व्यक्त केली. शिक्षकांनी मांडलेल्या न्याय्य मागण्यांबाबत संबंधित विभागाशी पाठपुरावा करून त्या मार्गी लावण्यासाठी आवश्यक ते प्रयत्न करण्यात येतील, तसेच शिक्षण क्षेत्राशी संबंधित विषय शासन स्तरावर प्रभावीपणे मांडले जातील, असे आश्वासन त्यांनी दिले.यावेळी शिक्षक सेनेचे जिल्हाध्यक्ष प्रसाद शिंदे यांनी सांगितले की, शिक्षकांच्या हक्कांसाठी आणि त्यांच्या विविध प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी शिक्षक सेना सातत्याने प्रयत्नशील आहे. जिल्ह्यातील प्रत्येक शिक्षकाच्या समस्या शासनापर्यंत पोहोचवून त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी संघटना कटिबद्ध असून, भविष्यातही शिक्षकांच्या हितासाठी संघर्ष आणि पाठपुरावा सुरूच राहणार आहे, असा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

### टीईटी पेपरफुटीप्रकरणी दोषींवर कठोर कारवाई करा; अन्यथा तीव्र आंदोलनाचा इशारा

अहिल्यानगर - शिक्षक पात्रता परीक्षा पेपरफुटी प्रकरणातील दोषींवर तातडीने आणि कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे कार्यकर्ते प्रा. अमोल खाडे यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. दोषींवर कठोर कारवाई झाली नाही, तर विद्यार्थ्यांच्या न्यायासाठी रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही या निवेदनातून देण्यात आला आहे. महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्या वतीने २८ जून रोजी आयोजित करण्यात आलेल्या शिक्षक पात्रता परीक्षेस राज्यभरातून चार लाख २८ हजार १२२ उमेदवारांनी अर्ज केला असून, त्यामध्ये सुमारे सव्वा दोन लाख सेवेतील शिक्षकांचाही समावेश आहे. अनेक विद्यार्थी वर्षानुवर्षे कठोर परिश्रम, आर्थिक अडचणी आणि मानसिक तणाव सहन करून या परीक्षेची तयारी करतात. अशा परिस्थितीत पेपरफुटीसारख्या गंभीर प्रकारामुळे प्रामाणिक विद्यार्थ्यांच्या मेहनतीवर पाणी फिरत असल्याची भावना निवेदनात व्यक्त करण्यात आली आहे. यावेळी प्रा. अमोल खाडे म्हणाले, शिक्षक होण्याचे स्वप्न पाहणारे हजारो युवक-युवती दिवस-रात्र अभ्यास करून परीक्षेची तयारी करतात. मात्र काही मोजक्या भ्रष्ट प्रवृत्तींच्या कृतीमुळे लाखो विद्यार्थ्यांचे भविष्य धोक्यात येत आहे. पेपरफुटी हा केवळ कायद्याचा भंग नसून विद्यार्थ्यांच्या विश्वासाशी केलेला विश्वासघात आहे. अशा गुन्ह्यांमध्ये सहभागी असलेल्या प्रत्येक आरोपीला कठोर शिक्षा झाली पाहिजे, तरच भविष्यात अशा घटना थांबतील. ते पुढे म्हणाले, सरकार आणि प्रशासनाने या प्रकरणाकडे केवळ गुन्हा म्हणून न पाहता विद्यार्थ्यांच्या भविष्याशी संबंधित अत्यंत संवेदनशील विषय म्हणून पाहण्याची गरज आहे.

# राष्ट्रीय पल्स पोलिओ मोहिमेनिमित्त डॉन बॉस्को परिसरात बालकांना पोलिओ डोस

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**अहिल्यानगर–** राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेनिमित्त अहिल्यानगर शहरात विविध भागांमध्ये शून्य ते पाच वर्षे वयोगटातील बालकांना पोलिओचे दोन थेंब देण्याची मोहीम उत्साहात राबविण्यात येत आहे. या मोहिमेअंतर्गत डॉन बॉस्को परिसरात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर यांच्या हस्ते बालकांना पल्स पोलिओचा डोस पाजून मोहिमेचा शुभारंभ करण्यात आला.

यावेळी महापालिका आरोग्य विभागातील अधिकारी, कर्मचारी, आशा सेविका तसेच परिसरातील पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी संपत बारस्कर म्हणाले की, भारताने पोलिओमुक्त देशाचा मान मिळविला असला तरी जगातील काही देशांमध्ये आजही पोलिओचे रुग्ण आढळत आहेत. त्यामुळे आपल्या देशात पोलिओचे पुनरागमन होऊ नये यासाठी प्रत्येक पात्र बालकाला पल्स पोलिओचा डोस देणे अत्यंत आवश्यक आहे. बालकांचे आरोग्य सुदृढ, निरोगी आणि सुरक्षित ठेवण्यासाठी प्रत्येक पालकाने आपल्या शून्य ते पाच वर्षे वयोगटातील पाल्याला पोलिओचे दोन थेंब अवश्य पाजावेत.

ते पुढे म्हणाले की, आज लसीकरणापासून वंचित राहिलेल्या बालकांपर्यंत पोहोचण्यासाठी पुढील पाच दिवस महापालिका आरोग्य विभागाचे अधिकारी, कर्मचारी आणि आशा सेविका घरोघरी जाऊन पोलिओचा डोस देणार आहेत. त्यामुळे एकही बालक लसीकरणापासून वंचित राहणार नाही, यासाठी सर्व पालकांनी आरोग्य विभागाला सहकार्य करावे. प्रत्येक बालकाचे निरोगी भविष्य हीच आपल्या सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे, असे आवाहन त्यांनी केले.

# केडगाव प्रभाग क्रमांक १७ मध्ये मोहिनीनगर जलकुंभ ते इंदिरानगर जलकुंभ नवीन जलवाहिनी कामाचे उद्घाटन



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** शहरात यापूर्वी कधीही एवढ्या मोठ्या प्रमाणावर विकासकामे झाली नव्हती. राज्य शासनाच्या माध्यमातून शहरातील विविध विकास प्रकल्पांसाठी मोठा निधी उपलब्ध करून देण्यात आला असून त्यातून नियोजनबद्ध आणि कायमस्वरूपीची विकासकामे मार्गी लागत आहेत. केडगाव हे शहरातील सर्वात मोठे उपनगर असून या परिसराच्या सर्वांगीण विकासासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. कायनेटिक चौक ते आरणगाव या मार्गाच्या चौपदरीकरणासाठी सातत्याने पाठपुरावा करण्यात आला. त्यातून या मार्गावर दुभाजक, फुटपाथ आणि पथदिव्यांची उभारणी करण्यात आली आहे.

माजी स्थायी समिती सभापती मनोज कोतकर यांनी केडगाव परिसरासाठी तीन पाण्याच्या टाक्या मंजूर करून आणल्या असून त्यांची कामे टप्प्याटप्प्याने पूर्ण होत आहेत. पुढील वीस वर्षांचा विचार करून विकासकामांचे नियोजन करण्यात आले आहे. ''आम्ही केवळ विकासाच्या काल्पनिक गप्पा मारत नाही, तर प्रत्यक्षात विकासकामे पूर्ण करण्यावर भर देत आहोत. मनोज कोतकर यांची कार्यक्षम नगरसेवक म्हणून ओळख आहे त्यांनी नागरिकांचे प्रश्न सातत्याने प्रशासनासमोर मांडले आहेत. या भागातील नागरिकांना केडगाव परिसरामध्ये दळणवळणासाठी भुयारी मार्गाची निर्मिती केली असून या कामासाठी मनोज कोतकर यांनी मा,खासदार डॉक्टर सुजय विखे पाटील व माझ्याकडे पाठपुरावा केला असल्यामुळेच हे काम पूर्ण झाले आहे, दौंड रोड परिसरातील लाईटचा प्रश्न कायमस्वरूपी सोडविण्यासाठीही प्रयत्न केले जातील, यापूर्वी नगरसेवक मनोज कोतकर यांनी जनतेच्या लाईटच्या प्रश्नासाठी आंदोलन केले होते विद्युत विभागाने त्यांच्यावर दोन गुन्हे दाखल केले आहे जनतेच्या प्रश्नासाठी आवाज उठवणारे नगरसेवक तुम्ही निवडून दिले आहे असे प्रतिपादन आमदार संग्राम जगताप यांनी केले.

# कुंभार गल्लीतील महिलांचा अनोखा उपक्रम; कुंडीतील वडाच्या झाडाची १२ वर्षांपासून अखंड पूजा

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**अहिल्यानगर–** वटपौर्णिमा हा सुवासिनींच्या श्रद्धा, परंपरा आणि अखंड सौभाग्याचे प्रतीक मानला जाणारा सण आज शहरासह जिल्हाभर मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. वडाच्या झाडाची विधीवत पूजा करून सात प्रदक्षिणा घालत पतीच्या दीर्घायुष्याची व अखंड सौभाग्याची प्रार्थना महिलांनी केली. शहरातील विविध भागांमध्ये वडाच्या झाडांजवळ महिलांची मोठी गर्दी पाहायला मिळाली. मात्र, चितळे रोड परिसरातील कुंभार गल्ली येथील महिलांनी गेल्या बारा वर्षांपासून जपलेली एक वेगळी परंपरा यंदाही सर्वांचे लक्ष वेधून घेत आहे.

कुंभार गल्लीतील महिलांनी तब्बल १२ वर्षांपूर्वी एक अभिनव निर्णय घेत आपल्या गल्लीतच एका कुंडीत वडाचे रोप लावले. परिसरात मोठे वडाचे झाड उपलब्ध नसल्याने आणि लांब अंतरावर जाऊन पूजा करण्याची अडचण लक्षात घेऊन, ''आपल्याच परिसरात वडाचे झाड वाढवू आणि त्याचीच पूजा करू,'' असा संकल्प त्यांनी केला. त्यानुसार लावलेल्या त्या रोपाची आजही अत्यंत प्रेमाने व श्रद्धेने देखभाल केली जात असून, प्रत्येक वर्षी वटपौर्णिमेला त्याच झाडाची विधीवत पूजा केली जाते.

यंदाही पहाटेपासूनच महिलांनी पारंपरिक वेशभूषेत एकत्र येत कुंडीतील वडाच्या झाडाची पूजा केली. झाडाला हळद-कुंकू वाहून, फुले अर्पण करून धागा बांधत सात प्रदक्षिणा घालण्यात आल्या. अखंड सौभाग्य, कुटुंबाचे आरोग्य, सुख-समृद्धी आणि पतीच्या दीर्घायुष्यासाठी महिलांनी मनोभावे प्रार्थना केली. धार्मिक विधींबरोबरच परिसरात आनंद, उत्साह आणि आपुलकीचे वातावरण निर्माण झाले होते.

या उपक्रमाचे विशेष वैशिष्ट्य म्हणजे धार्मिक परंपरेसोबतच पर्यावरण संवर्धनाचा संदेशही दिला जात आहे. केवळ पूजा करण्यापुरते झाड न पाहता त्याचे संवर्धन आणि संगोपन करण्याची जबाबदारीही महिलांनी स्वीकारली आहे. गेली बारा वर्षे त्या झाडाची नियमित काळजी घेतली जात असून, ते अधिक वाढल्यानंतर त्याचे कायमस्वरूपी वृक्षारोपण याच गल्लीत करण्याचा महिलांचा मानस आहे.

# ग्रामीण विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना पंख देणे हेच संस्थेचे ध्येय – डॉ. भाऊसाहेब खिलारी

### ढोकेश्वर विद्यालयातील गुणवंत विद्यार्थ्यांचा भव्य सत्कार

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**टाकळी ढोकेश्वर–** ग्रामीण व आदिवासी भागातील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावे आणि त्यांच्या स्वप्नांना बळ मिळावे, यासाठी अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्था सातत्याने कार्यरत आहे. शिक्षण क्षेत्रात कोचिंगच्या नावाखाली मोठ्या प्रमाणावर लूट सुरू असून, पेपरफुटीसारख्या घटनांचा सर्वाधिक फटका ग्रामीण विद्यार्थ्यांना बसतो. मात्र स्वयंशिस्त आणि योग्य मार्गदर्शनाच्या बळावर विद्यार्थी निश्चित यश मिळवू शकतात, असे प्रतिपादन संस्थेच्या गव्हर्निंग कौन्सिलचे सदस्य डॉ. भाऊसाहेब खिलारी यांनी केले.

ढोकेश्वर ज्युनिअर कॉलेजमध्ये आयोजित – परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार समारंभात अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. त्यांच्या मार्गदर्शनाखाली एक वर्षापूर्वी सुरू करण्यात आलेल्या डॉ. सी. व्ही. रमण केंद्राच्या माध्यमातून सन २०२५-२६ मधील – परीक्षेत व या दोन्ही गटातील विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले. गटात सुयोग शिंदे (९६.४१), भक्ती वाळुंज (९५.६६), सानिका शेळके (९२.८५), सोहम सोनावळे (९२.६१), श्रद्धा रोकडे (९१.३८), आदेश झावरे (९०.८०) यांच्यासह अनेक विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय गुण मिळवले. तर गटात समृद्धी वीरकर (९६.५१), भव्यता चौधरी (९६.१९), समीक्षा पवार (९१.९७), तन्मय रोकडे (९०.०६), आदित्य राऊत (८९.२०) यांच्यासह अन्य विद्यार्थ्यांनी घवघवीत यश मिळवले.

यशस्वी विद्यार्थी व त्यांच्या पालकांचा सत्कार डॉ. भाऊसाहेब खिलारी, प्राचार्य बाळासाहेब खिलारी, पर्यवेक्षक बाळासाहेब निवडुंगे, पत्रकार चांद शेख, भोंद्रे गावचे सरपंच अभिजित झावरे यांच्या हस्ते करण्यात आला. या विद्यार्थ्यांना वर्षभर अशोक गांगड, अतिश झावरे, योगेश मांडगे, सचिन महानवर, भाऊसाहेब हिंगडे, सुनील झावरे, मंगेश पोपळघट, नितीन ढोकळे, सोनल शिंदे आणि मिना खाडे यांनी मार्गदर्शन केले.

कार्यक्रमास संतोष सोनावळे, डॉ. अरुण झावरे, शंकर शेळके, छबुराव चौधरी, सूर्यभान भालेकर, संदीप बांडे, मेजर अशोक रोकडे, गणेश शिंदे, संतोष भांड, शांताराम आंधळे, भरत भांड, वनिता भांड, रावसाहेब रोकडे, संदीप रोकडे, बाळासाहेब झावरे, संजय शिंदे, यशवंत वीरकर यांच्यासह अनेक पालक व शिक्षक उपस्थित होते. सूत्रसंचालन भाऊसाहेब हिंगडे यांनी केले, प्रास्ताविक अशोक गांगड यांनी तर आभार सचिन महानवर यांनी मानले.

**टाकळीकर ग्रामविकास प्रतिष्ठानकडून स्मार्ट बोर्डचे आश्वासन**

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शहरातील विद्यार्थ्यांप्रमाणे आधुनिक व दर्जेदार शिक्षण मिळावे, या उद्देशाने टाकळीकर ग्रामविकास प्रतिष्ठानच्या वतीने ढोकेश्वर विद्यालयाला एक स्मार्ट बोर्ड भेट देण्याचे आश्वासन प्रतिष्ठानचे सचिव चांद शेख आणि डॉ. भाऊसाहेब खिलारी यांनी या प्रसंगी जाहीर केले. या निर्णयाचे उपस्थित शिक्षक, विद्यार्थी व पालकांनी स्वागत करत समाधान व्यक्त केले.

# महेश नवमी स्नेहमेळाव्यात समाजबंध दृढ; रक्तदान शिबिरात १६१ रक्तपिशव्यांचे संकलन



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** श्री माहेश्वरी युवक मंडळ, अहिल्यानगर यांच्या वतीने महेश नवमी निमित्त आयोजित करण्यात आलेला स्नेहमेळावा मोठ्या उत्साहात, धार्मिक वातावरणात आणि समाजबंध दृढ करणाऱ्या विविध उपक्रमांनी संपन्न झाला. सांस्कृतिक कार्यक्रम, गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार, रक्तदान शिबिर, आध्यात्मिक सादरीकरणे आणि समाजातील विविध कुटुंबांच्या सहकार्यामुळे हा सोहळा संस्मरणीय ठरला.

प्रारंभी मंडळाचे अध्यक्ष अमित खटोड प्रास्तविक करून मंडळाद्वारे वर्षभर राबवण्यात येणाऱ्या कार्याबाबत माहिती दिली. कार्यक्रमाच्या प्रमुख म्हणून बालमानसोपचार तज्ञ् प्रा मानसी गगधानी यांनी ''विचारांमधील छोट्या सकारात्मक बदलांद्वारे मानसिक शांती, भावनिक स्थिरता आणि निरोगी नातेसंबंधांकडे होणारा अर्थपूर्ण प्रवास'' या विषयावर प्रभावी मार्गदर्शन केले. त्यांनी सांगितले की, आजच्या धकाधकीच्या जीवनात मानसिक आरोग्य जपणे अत्यंत आवश्यक आहे. सकारात्मक विचारसरणी, कुटुंबातील संवाद, परस्पर विश्वास आणि आत्मपरीक्षण यामुळे जीवन अधिक आनंदी व संतुलित बनते. प्रत्येकाने स्वतःमध्ये छोटे-छोटे सकारात्मक बदल घडवून आणले, तर त्याचा परिणाम संपूर्ण कुटुंब आणि समाजावरही सकारात्मक स्वरूपात दिसून येतो, असे त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमाची सुरुवात गायत्री काबरा, विधी जाजू आणि रुई झंवर यांच्या गणेश वंदनेने झाली. अर्चना झंवर यांच्या श्लोक व मंत्र पठण साप्ताहिक वर्गातील विद्यार्थी-विद्यार्थिनींनी शिवतांडव स्तोत्र सादर करून उपस्थितांची मने जिंकली. त्यानंतर भूषण मालू, रचित काबरा, रिया मणियार आणि प्रीशा सोनी यांनी महेश वंदना, आरती व भजन जॅमिंगची आकर्षक प्रस्तुती सादर केली. कु. विहा मालू व कु. मिहिका जाजू यांनी भारतनाट्यमद्वारे सादर केलेली शिवस्तुती विशेष दाद मिळवून गेली. महिला मंडळातर्फे सादर करण्यात आलेल्या सांस्कृतिक कार्यक्रमांनाही उपस्थितांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. मनीषा झंवर यांनी सुंदर रांगोळी साकारून कार्यक्रमस्थळी आकर्षण निर्माण केले.

यावेळी शालेय गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. या पारितोषिक वितरणाचे प्रायोजकत्व मनीष सोमानी व सोमानी परिवार यांनी केले. महेश नवमी उत्सवाच्या पत्रिकेचे प्रायोजकत्व श्रीगोपाल जखोटिया यांनी स्वीकारले. स्नेहमिलनाचे मुख्य प्रायोजक राघवेंद्र नंदकिशोर बिहानी व बिहानी (बंगडीवाला) परिवार होते.

कार्यक्रमासाठी श्रीगोपाल धूत, मोहनलाल मानधना, नंदलाल मणियार, प्रवीण विनोद बजाज, कृष्णगोपाल चांडक आणि सारडा परिवार यांनी विशेष सहकार्य केले. महेश नवमी उत्सवातील सर्व कार्यक्रमांचे डिजिटल डिझायनिंग सिद्धीगणेश ऑफसेटचे मनीष झंवर यांनी केले.

अमित बिहाणी व वैष्णवी लड्ढा यांनी कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन केले. प्रकल्प अध्यक्ष म्हणून पवन बंग, अनिकेत बलदवा, विशाल झंवर आणि शाम भुतडा यांनी नियोजनाची जबाबदारी यशस्वीपणे पार पाडली. सेक्रेटरी पियुष झंवर यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# पैठण शहर काँग्रेसच्या अध्यक्षपदी हसनोद्दीन कट्टयारे यांची फेरनिवड

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**पैठण–** अखिल भारतीय काँग्रेस समितीच्या संघटन सृजन अभियान अंतर्गत करण्यात आलेल्या संघटनात्मक फेररचनेत पैठण शहर काँग्रेस (ब्लॉक) अध्यक्षपदी नगरसेवक हसनोद्दीन कट्टारे यांची पुन्हा एकदा निवड करण्यात आली आहे.

तालुका व जिल्हास्तरावरील मुलाखती, कार्याचा आढावा आणि संघटनात्मक अहवालाच्या आधारे पक्षश्रेष्ठींनी हा निर्णय घेतला. पक्षनिष्ठा, संघटन कौशल्य आणि स्थानिक पातळीवरील जनसंपर्क या बाबींचा विचार करून कट्टयारे यांच्यावर पुन्हा जबाबदारी सोपविण्यात आली.

कट्टयारे यांच्या फेरनिवडीचे वृत्त समजताच शहर व तालुक्यातील काँग्रेस कार्यकर्त्यांनी आनंद व्यक्त केला. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर काँग्रेस संघटना अधिक बळकट करण्यासाठी ते प्रयत्नशील राहतील, असा विश्वास पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांनी व्यक्त केला.

यावेळी खासदार डॉ. कल्याण काळे, जिल्हाध्यक्ष सय्यद अक्रम, कमाल फारुकी, इब्राहिम पठाण, जगन्नाथ काळे, अनिल पाटील, दिलीप भोसले, रमेश मुळे, किशोर दसपुते, शेखर देशमुख, खबीर आळणे, युनूस पठाण, गणेश गायकवाड, संभाजी कोटे, अंबादास ढवळे, मुस्ताक पठाण, पाशाभाई मंजन, महेश पवार, बाबू नजन यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी कट्टारे यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

आकर्षण हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी दैनिक आकर्षण प्रिंटर्स , प्लॉट क्र. ९२, भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस- प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक विजय शामराव सांगळे, व्यवस्थापक तुकाराम कामटे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर - ७७७६८१२८११. ई-मेल: dainikaakarshan@gmail.com. (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)

The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at DAINIK AKARSHAN PRINTERS, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). "Editor - Vijay Shamrao Sangale, Manager - Tukaram Kamte, Phone no. of main office-7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com ("The responsibility under the PRB Act will be on him.")

## दै. आकर्षण निवडक

### रामवाडीत राष्ट्रीय पल्स पोलिओ मोहिमेला उत्स्फूर्त प्रतिसाद



अहिल्यानगर - राष्ट्रीय पल्स पोलिओ मोहिमेअंतर्गत रविवारी (दि. २८ जून) रामवाडी परिसरात महापालिका आरोग्य विभागाच्या माध्यमातून पोलिओ लसीकरण मोहिम उत्साहात राबविण्यात आली. रामवाडी आरोग्य केंद्रात आयोजित या मोहिमेला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. लहान बालकांना पोलिओसारख्या गंभीर आजारापासून संरक्षण मिळावे आणि प्रत्येक बालकाचे शंभर टक्के लसीकरण व्हावे, या उद्देशाने कागद, काच, पत्रा कष्टकरी पंचायत, अहिल्यानगर शाखेच्या वतीने योगदान देण्यात आले. रामवाडी आणि परिसरातील कष्टकरी, स्थलांतरित व कामगार कुटुंबांपर्यंत प्रत्यक्ष जाऊन जनजागृती करण्यात आली. रामवाडी आरोग्य केंद्रात सकाळपासूनच आपल्या चिमुकल्यांना पोलिओचे दोन थेंब पाजण्यासाठी पालकांनी मोठी गर्दी केली होती. आरोग्य कर्मचाऱ्यांनी नियोजनबद्ध पद्धतीने लसीकरण प्रक्रिया पार पाडत प्रत्येक बालकाला सुरक्षितपणे पोलिओचे डोस दिले. दिवसभरात तीनशेपेक्षा अधिक बालकांचे लसीकरण करण्यात आल्याने ही मोहीम यशस्वी ठरली.रामवाडी आरोग्य केंद्राच्या परिचारिका रोहिणी बोरुडे आणि सेविका नीता उडानशिवे यांनी बालकांना पोलिओचे डोस देण्याचे काम जबाबदारीने पार पाडले. लसीकरणादरम्यान पालकांना पोलिओ प्रतिबंधाचे महत्त्व, नियमित लसीकरणाचे फायदे तसेच राष्ट्रीय पल्स पोलिओ मोहिमेचे उद्दिष्ट याबाबत मार्गदर्शनही करण्यात आले.पोलिओमुक्त भारताचे स्वप्न साकार करण्यासाठी प्रत्येक पालकाने आपल्या पाच वर्षांखालील बालकाला राष्ट्रीय पल्स पोलिओ मोहिमेदरम्यान पोलिओचे दोन थेंब अवश्य पाजावेत. प्रत्येक बालकापर्यंत लसीकरण पोहोचल्यासच पोलिओसारख्या आजारावर कायमस्वरूपी मात करणे शक्य होईल, असा विश्वास विकास उडाणशिवे यांनी व्यक्त केला.

### पानपट्टी व्यावसायिकांचा ७ जुलै रोजी मुंबईच्या आझाद मैदानावर धडक मोर्चा

अहिल्यानगर - महाराष्ट्र अन्न व औषध प्रशासन विभागाकडून पान व्यावसायिकांवर सुरू असलेल्या कारवाईच्या निषेधार्थ महाराष्ट्र पान व्यापारी महासंघाने राज्यव्यापी आंदोलनाची हाक दिली असून, ७ जुलै २०२६ रोजी मुंबई येथील आझाद मैदानावर भव्य धडक मोर्चा आयोजित करण्यात आला आहे. या मोर्चात राज्यभरातील लाखो पान व्यावसायिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन महासंघाच्या वतीने अहिल्यानगर जिल्हा अध्यक्ष फैय्याज तांबोळी यांनी केले आहे. मोर्चाच्या पार्श्वभूमीवर ३ जुलै २०२६ रोजी अहिल्यानगर जिल्हा पान असोसिएशनच्या वतीने भव्य मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. सीताबन लॉन, सुखसागर हॉटेल मागे, कोठी रोड, मार्केट यार्ड, अहिल्यानगर येथे सकाळी ११ वाजता हा मेळावा होणार असून, महाराष्ट्र पान व्यापारी महासंघाचे प्रदेशाध्यक्ष अजित सूर्यवंशी उपस्थित राहून व्यावसायिकांना मार्गदर्शन करणार आहेत. महासंघाच्या म्हणण्यानुसार, अन्न व औषध प्रशासन विभागाच्या कारवाईमुळे राज्यातील पानपट्टीधारकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. सुगंधित तंबाखूवरील बंदी, मोक्का अंतर्गत कारवाई, तसेच पान व्यावसायिकांवर होत असलेल्या कथित अन्यायकारक कारवायांमुळे व्यापाऱ्यांमध्ये तीव्र नाराजी आहे.मोर्चाद्वारे शासनाकडे काही महत्त्वाच्या मागण्या करण्यात येणार असून, त्यामध्ये अन्यायकारक कारवाया तात्काळ थांबविणे, सुगंधित तंबाखूवरील बंदी उठविणे, पानपट्टीधारकांना आर्थिक मदत व कर्जसुविधा उपलब्ध करून देणे, प्रत्येक पान दुकानधारकाच्या कुटुंबातील एका सदस्याला शासकीय किंवा निमशासकीय नोकरीत सामावून घेणे, तसेच पान व्यवसायासाठी स्वतंत्र आर्थिक विकास महामंडळाची स्थापना करणे आदी मागण्यांचा समावेश आहे. अहिल्यानगर जिल्ह्यातील पानपट्टीधारक, होलसेल व्यापारी, फेरीवाले आणि संबंधित सर्व व्यावसायिकांनी ३ जुलैच्या मेळाव्यास तसेच ७ जुलैच्या मुंबई मोर्चात मोठ्या संख्येने सहभागी होऊन संघटनेची ताकद दाखवावी, असे आवाहन अहिल्यानगर जिल्हा पान असोसिएशनचे जिल्हाध्यक्ष फैय्याज तांबोळी यांच्या वतीने करण्यात आले.

## गोविंद गायकवाड यांची भाजप युवा मोर्चाच्या शहर जिल्हा उपाध्यक्षपदी नियुक्ती

**युवा कार्यकर्त्यांना सोबत घेऊन काम करण्याचा निर्धार; प्रदेशाध्यक्ष कृष्णराज महाडिक यांच्या हस्ते नियुक्तीपत्र देऊन सत्कार**

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**अहिल्यानगर–** भारतीय जनता पार्टी युवा मोर्चाच्या शहर जिल्हा उपाध्यक्षपदी गोविंद शिवाजीराव गायकवाड यांची नियुक्ती करण्यात आली आहे. पक्षसंघटनेत सातत्याने केलेले कार्य, युवकांमधील सक्रिय सहभाग आणि संघटनात्मक बांधिलकीची दखल घेत पक्षश्रेष्ठींनी त्यांच्यावर ही महत्त्वाची जबाबदारी सोपविली आहे.

भाजप युवा मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष कृष्णराज महाडिक यांच्या हस्ते गोविंद गायकवाड यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले. यावेळी भाजपा जिल्हा सरचिटणीस निखिल वारे, नगरसेवक करण कराळे, महेश लोंढे, सुजय मोहिते, युवा मोर्चाचे सरचिटणीस कैलास गर्जे, उपाध्यक्ष सोमनाथ जाधव, सचिव सुयश नरसाळे, विजय भालेकर यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

भाजपचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण, राज्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, भाजप प्रदेश उपाध्यक्ष सुजय विखे पाटील, युवा मोर्चाचे प्रदेश प्रभारी सुनील राणे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच भाजप शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते आणि भाजपा युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष ॲड. ऋद्रेश अंबाडे यांच्या सूचनेनुसार ही नियुक्ती करण्यात आल्याची माहिती देण्यात आली.

गोविंद गायकवाड यांनी पक्षसंघटना अधिक मजबूत करण्यासाठी युवकांना मोठ्या प्रमाणात भाजपशी जोडण्याचे काम करणार आहे. शासनाच्या विविध योजना सामान्य नागरिकांपर्यंत पोहोचविणे, सामाजिक उपक्रम राबविणे आणि जनतेच्या प्रश्नांसाठी सातत्याने आवाज उठविणे आणि भाजप सरकारच्या माध्यमातून त्यांना न्याय मिळवून देण्याचे काम केले जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.

गोविंद गायकवाड यांनी यापूर्वी विविध सामाजिक उपक्रम, पक्ष संघटन वाढविण्याचे प्रयत्न आणि युवकांना भाजपच्या विचारांशी जोडण्याचे कार्य केले आहे. त्यांच्या सक्रिय कामाची दखल घेत त्यांना शहर जिल्हा उपाध्यक्षपदाची जबाबदारी देण्यात आलेली आहे. या निवडीबद्दल भाजपचे पदाधिकारी, कार्यकर्ते, मित्रपरिवार आणि विविध सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांनी गोविंद गायकवाड यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## एमआयडीसी पोलिसांची धडक कारवाई; अवैध दारू अड्ड्यांवर छापे, गुटखाही जप्त

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**अहिल्यानगर–** पैठण एमआयडीसी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक भरत मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी अवैध धंद्यांविरोधात धडक कारवाई करत इसारवाडी, डोणगाव चौफुली व दियानतपूर येथील अवैध देशी दारू अड्ड्यांवर छापे टाकले. या कारवाईत मोठ्या प्रमाणात अवैध दारू जप्त करण्यात आली असून संबंधितांविरुद्ध गुन्हे दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

दरम्यान, शनिवारी सकाळी सुमारे ११.१५ वाजता अन्न व औषध प्रशासन विभागाने जैन स्पिनर परिसरातील अरमान पान सेंटर येथे धाड टाकून प्रतिबंधित गुटखा, मावा व सुगंधित तंबाखूचा साठा जप्त केला. या प्रकरणी टपरी चालक नदीम निसार सय्यद (रा. मदिनानगर) याच्याविरुद्ध गुन्हा क्र. ०२०३/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता () कलम २७४, २७५, २२३ तसेच अन्न सुरक्षा व मानके अधिनियम, २००६ मधील कलम ५९ अंतर्गत पैठण एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अवैध दारूविक्री व प्रतिबंधित तंबाखूजन्य पदार्थांच्या विक्रीविरोधातील कारवाई यापुढेही अधिक तीव्र करण्यात येणार असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे.

## श्री सत्यसाईबाबांच्या दिव्य पादुकांसह रथयात्रेचे दि.३ जुलैला नगरमध्ये शाही थाटात होणार आगमन

**श्री सत्यसाई सेवा संघटना स्वागतासाठी सज्ज : भक्तांमध्ये उत्साह, जय्यत तयारी पूर्ण**

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी




**अहिल्यानगर–** मानव, बंधुत्व आणि ईश्वरी पितृत्व या वैश्विक भावनेने सत्य, धर्म, शांती, प्रेम, एकता असे राष्ट्रहिताचे महत्वपूर्ण संदेश संपूर्ण भारतभर देत निघालेल्या श्री सत्यसाई प्रेमवाहिनी रथयात्रेचे आणि दिव्य पादुकांचे आगमन नगर जिल्ह्यात काष्टी येथे शुक्रवार दि.३ जुलै २०२६ ला होणार आहे. रथासोबत असलेल्या श्री सत्यसाईबाबांच्या दिव्य पादुका दर्शनाचा लाभ भाविकांना जवळून मिळणार आहे, अशी माहिती श्री सत्यसाई सेवा संघटनेचे जिल्हाप्रमुख श्री. अशोक कुरापाटी यांनी दिली.

ते म्हणाले, आपल्या जिल्ह्याच्यावतीने काष्टी येथे स्वागत सोहळा संपन्न झाल्यावर दि.३ जुलैला सायंकाळी ५ वाजता कायनेटिक चौकापासून रथासोबत मोटारसायकल व सायकल रॅली निघेल. स्टेशन रोडवरील सक्कर चौकात रथयात्रेचे स्वागत होईल. सक्कर चौकापासून शोभायात्रा सुरू होईल. शोभायात्रेच्या अग्रभागी सनी चौघडा, तुतारी, बॅण्ड पथक, लेझीम पथक, बाल वारकरी रहातील. गुरू पालक, ज्येष्ठ नागरिक आणि श्री सत्य साई भक्त परिवार शोभायात्रेत मोठ्या संख्येने सहभागी होईल. रथावर ठिकठिकाणी पुष्पवृष्टी केली जाईल. नवीन टिळक रोडवरील नंदनवन लॉन्समध्ये या शोभायात्रेचे आगमन जल्लोषपूर्ण वातावरणात होईल.

सायंकाळी ६ ते ९ या वेळेत रथामधील पादुकांचे विधीवत पूजन, वेदपठण आणि मंगल महाआरती होईल. सर्व धर्मांचे प्रमुख धर्मगुरू सर्वधर्मीय सामुदायिक प्रार्थना करतील. त्यानंतर सांस्कृतिक महोत्सव पार पडेल. शनिवारी दि.४ जुलैला पहाटे नगर संकीर्तन, सकाळी ७ ते ८.३० पुरोहित ब्रम्हवृंदांचे वेद मंत्र पठण, साई भक्तांचे घरी श्री स्वामी पादुका पूजन, सकाळी ९ ते ११ या वेळेत श्री सत्य साई बाल विकास भजन महोत्सव पार पडेल. ५६ प्रकारच्या सात्विक पदार्थांचा नैवेद्य अर्पण केला जाईल. दुपारी ३ वाजता ही रथयात्रा नंदनवन लॉन्समधून प्रस्थान करेल. आयुर्वेद कॉर्नर, नेप्ती नाका, दिल्लीगेट, सारडा कॉलेज, प्रेमदान चौक, प्रोफेसर कॉलनी चौक, कुष्ठधाम रोड, श्रमिक नगर, भिस्तबाग नाका, पाईपलाईन रोड, श्रीराम चौक, दसरे नगर अशा नगर शहरातील विस्तारीत उपनगरांमधून सायंकाळी ५ वाजता पांढरी पुलाजवळील मिरी येथे रथयात्रा पोहोचेल. सायंकाळी ५ ते ७ मिरी येथे रथातील पादुका दर्शन सोहळा आणि महाप्रसाद होईल. रात्री श्री क्षेत्र देवगड येथे रथयात्रा मुक्कामी पोहोचेल. देवगडला श्री दत्त देवस्थानमधील भाविकांचा अध्यात्मिक कार्यक्रम, मंगल आरती, दिव्य दर्शन सोहळा पार पडेल.

रविवारी दि.५ जुलैला सकाळी ११ वाजता श्री क्षेत्र देवगड येथून प.पू.हभप भास्करगिरी महाराजांच्या प्रमुख उपस्थितीत ही रथयात्रा छत्रपती संभाजीनगरकडे प्रयाण करेल.

१९६८-६९ साली नगर शहर आणि मिरी येथे श्री सत्यसाई सेवा समितीची स्थापना झाली. मानव सेवा हीच ईश्वरी सेवा हे ब्रीद समोर ठेवून गेली ५८ वर्षे या समितीच्यावतीने अध्यात्मिक, वैद्यकीय, सामाजिक, शैक्षणिक सेवा कार्य सातत्याने सुरू आहे. त्यात अध्यात्मिक प्रबोधन, भजन, बालविकास, आरोग्य शिबीरे, निराधारांना मदत, अन्नदान, नैसर्गिक आपत्तीच्या वेळी मदत कार्य हे सर्व



श्रीसत्यसाईबाबांचे दिव्य संदेश आणि शिकवणुकीप्रमाणे साईभक्त सेवाभावी वृत्तीने करत आहेत.

प्रत्येकालाच श्रद्धेच्या ठिकाणी जाऊन श्रीगुरूचरणी नतमस्तक होणे शक्य नसते. रथयात्रेमुळे श्री स्वामी स्वतः आपल्या घरी येत आहेत, ही भाविकांची श्रद्धा असल्याने रथयात्रेची जय्यत तयारी करण्यात आली आहे. रथयात्रेच्या यशस्वी संयोजनासाठी श्री सत्यसाई सेवा संघटनेचे जिल्हा प्रमुख अशोक कुरापाटी, अध्यात्मिक प्रमुख प्रा.ज्योती कुलकर्णी, अमोल सप्तर्षी, डॉ.शामसुंदर केकडे, ॲड रावसाहेब मिरीकर, नानासाहेब मिरीकर, स्वाती मिरीकर, नंदलाल व नलिनी भालेराव, नरसिंग व शोभा दुसा, अनिल व रेखा शर्मा, दिलीप मेहेर, ज्योती श्रोत्री, विलास नडिमेटला, विजय चावक, फुलचंद भळगट, शकुंतला पाटील, श्रीकृष्ण धर्माधिकारी, नितीन भंडारी, प्रा.काथार, रूक्मिणी संदुपटला, राजश्री राऊत, श्रुती केकडे आदि साईभक्त परिश्रम घेत आहेत.

## ‘सहा महिन्यांत पाणी द्या, नाहीतर जलसंपदामंत्र्यांच्या दारात गाशा मांडणार’

**ॲड.काकडे दाम्पत्याच्या नेतृत्वात ताजनापूर टप्पा क्र. १ साठी शेवगावच्या शेतकऱ्यांचा जलसंपदा कार्यालयातच ठिय्या; कार्यकारी अभियंता पाटील यांचे ६ महिन्यांत काम सुरू करण्याचे आश्वासन**

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** ताजनापूर लिफ्ट सिंचन योजना टप्पा क्र. ०१ मधील १३ गावांच्या जलसिंचन योजनेची अंमलबजावणी व्हावी, या मागणीसाठी आज शेवगाव तालुक्यातील शेकडो शेतकऱ्यांसह कृती समितीचे प्रमुख ॲड.शिवाजीराव काकडे आणि माजी जिल्हा परिषद सदस्या सौ. हर्षदा काकडे यांनी जिल्हा जलसंपदा कार्यालयावर धडक दिली. संबंधित जिल्ह्याचे कार्यकारी अभियंता पाटील यांची भेट घेऊन शेतकऱ्यांनी मागण्यांचे तीव्र निवेदन सुपूर्त करत येत्या सहा महिन्यांत योजनेची अंमलबजावणी करण्याची आग्रही मागणी मांडली. मागणी मान्य न झाल्यास थेट जलसंपदामंत्र्यांच्या दारात शेतकऱ्यांसह गाशा मांडणार असल्याचा इशारा दिला.

निवेदन देताना ॲड. काकडे यांनी प्रशासकीय दिरंगाईवर तीव्र शब्दांत प्रहार केला. ते म्हणाले,१९६५ साली जायकवाडी धरणासाठी शेवगाव तालुक्यातील २९ सुपीक गावांनी त्याग केला. या त्यागामुळे तालुक्याला ३.८ टी.एम.सी. पाणी राखीव मिळाले. त्यातील २.२ टी.एम.सी. पाणी टप्पा क्र. २ साठी वापरले गेले, तर उर्वरित १.६ टी.एम.सी. पाणी टप्पा क्र. १ साठी मंजूर असूनही अद्याप योजना रखडली आहे. गेल्या वर्षी पाणी न मिळाल्याने यावर्षी शेतकऱ्यांची शेकडो हेक्टर वरील पिके होरपळून



(छाया : बाबा पालवे)

गेली आहेत. आता शेतकरी थांबायला तयार नसून ही आरपारची लढाई आहे.

शेतकऱ्यांचा आक्रमक पवित्रा आणि पाण्याचा प्रश्न गांभीर्याने घेत कार्यकारी अभियंता पाटील यांनी उपस्थित सर्व शेतकऱ्यांना आश्वस्त केले. त्यांनी योजनेच्या सद्यस्थितीची सविस्तर माहिती देत योजनेची अंतर्गत तांत्रिक प्रक्रिया पूर्ण होत आली असून, शासन पातळीवरून सुप्रमा मिळताच तात्काळ निविदा प्रक्रिया राबवली जाईल. सर्व प्रशासकीय सोपस्कार पूर्ण करून पुढील ६ महिन्यांच्या आत जमिनीवर प्रत्यक्षात कामाला सुरुवात केली जाईल. तसेच भविष्यात विजेच्या तांत्रिक अडचणीमुळे योजना बंद पडू नये, यासाठी या प्रकल्पात सोलर सिस्टीम (सौर ऊर्जा प्रणाली) समाविष्ट करण्यात आली असल्याची माहिती त्यांनी दिली. त्याचप्रमाणे योजनेच्या दुरुस्ती व देखभालीचा खर्च देखील योजनेच्या अंदाजपत्रकात गृहीत धरण्यात आला आहे, ज्यामुळे योजना भविष्यात विनातक्रार सुरू राहील अशी माहिती त्यांनी दिली.

दरम्यान, येत्या ६ महिन्यांत योजना सुरू करण्याच्या मागणीवर कार्यकारी अभियंत्यांनी सकारात्मक आणि ठोस आश्वासन दिल्यामुळे शेतकऱ्यांनी तूर्तास समाधान व्यक्त केले आहे. मात्र, प्रशासनाने दिलेल्या या शब्दाची वेळेत पूर्तता न झाल्यास थेट मंत्र्यांच्या कार्यालयावर धडक मारण्याच्या निर्धारावर शेतकरी ठाम आहेत. यावेळी कृती समितीचे अध्यक्ष ॲड. काकडे, माजी जिल्हा परिषद सदस्या सौ. काकडे, कृती समितीचे निमंत्रक लक्ष्मण गवळी, सखाहारी भापकर, राम पोटफोडे, सुधाकर धावणे, ॲड. संजय काकडे, भाऊसाहेब सातपुते, साहेबराव बोडखे, दत्तू भापकर, दत्ता औटी, नवनाथ ढाकणे, मधुकर झिरपे, आजिनाथ ढाकणे, अब्बास सय्यद, डॉ. दादासाहेब जवरे, अमोल टेकाळे, भीमसेन गिरमकर, कडू रुईकर, मच्छिंद्र टेकाळे, संदीप झिरपे आकाश झिरपे, तुळशीराम रुईकर, भाऊसाहेब बोडखे, भीमराज बोडखे, विक्रम केदार, विष्णू शिरसाठ, माणिक म्हस्के यांचेसह योजनेत समाविष्ट असलेल्या १३ गावांमधील शेतकरी, कृती समितीचे सदस्य आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## डॉ. विठ्ठलराव विखे पाटील कृषी महाविद्यालयाला महात्मा फुले कृषी विद्यापीठाकडून ‘अ’ दर्जा



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** विळद घाट येथील डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फाउंडेशन संचलित डॉ. विठ्ठलराव विखे पाटील कृषी महाविद्यालय यास महात्मा फुले कृषी विद्यापीठ यांच्या मूल्यांकन प्रक्रियेत मानाचा ‘अ’ दर्जा प्राप्त झाला आहे. महाविद्यालयाच्या शैक्षणिक गुणवत्ता, संशोधन कार्य, विस्तार शिक्षण उपक्रम, पायाभूत सुविधा आणि विद्यार्थीकेंद्रित उपक्रमांची ही उल्लेखनीय पोचपावती मानली जात आहे. महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद मान्यताप्राप्त तसेच महात्मा फुले कृषी विद्यापीठाशी संलग्न असलेल्या या महाविद्यालयाने गुणवत्तापूर्ण कृषी शिक्षण, संशोधन आणि विस्तार कार्याच्या माध्यमातून उल्लेखनीय प्रगती साधली आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी उपलब्ध करून देण्यात आलेल्या आधुनिक सुविधा, सुसज्ज प्रयोगशाळा, अनुभवी प्राध्यापकवर्ग आणि नाविन्यपूर्ण शैक्षणिक उपक्रमांमुळे महाविद्यालयाने कृषी शिक्षण क्षेत्रात स्वतः ची स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. महात्मा फुले कृषी विद्यापीठाच्या मूल्यांकन समितीने महाविद्यालयातील शैक्षणिक, संशोधन, विस्तार शिक्षण, प्रशासकीय व्यवस्था, पायाभूत सुविधा तसेच विद्यार्थी कल्याणविषयक उपक्रमांचे सखोल मूल्यमापन करून महाविद्यालयास ‘अ’ दर्जा प्रदान केला आहे. हा दर्जा महाविद्यालयाच्या सातत्यपूर्ण गुणवत्ता वृद्धीचा आणि उत्कृष्ट कार्याचा गौरव असल्याचे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. बी. राऊत यांनी सांगितले.

या यशामागे संस्थेचे सचिव डॉ. पी. एम. गायकवाड, संचालक डॉ. अभिजित दिवटे तसेच तंत्र संचालक सुनील कल्हापुरे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. या उल्लेखनीय यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष तथा राज्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील तसेच संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांनी महाविद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या. भविष्यातही महाविद्यालय शैक्षणिक गुणवत्ता, संशोधन आणि कृषी क्षेत्रातील उत्कृष्टता कायम राखत नवे मानदंड प्रस्थापित करेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. या यशाबद्दल महाविद्यालयातील प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थी आणि माजी विद्यार्थ्यांनी आनंद व्यक्त केला असून संस्थेच्या प्रगतीमध्ये योगदान देणाऱ्या सर्वांचे मनःपूर्वक आभार मानण्यात आले आहेत. महाविद्यालय भविष्यातही कृषी शिक्षण, संशोधन आणि शेतकरी हिताच्या उपक्रमांद्वारे कृषी क्षेत्राच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध राहणार असल्याचे संस्थेने स्पष्ट केले आहे.

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषत: शहर अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील अहिल्यानगर - ३ सावेडी भागातील लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात नमुद केलेल्या मिळकतीचे विद्यमान मालक बाबासाहेब दशरथ शेंदुरकर यांनी मान्यता देणार शंकुतला बाबासाहेब शेंदुरकर दोघे रा, खडकापूर, मारुती मंदिर, इंदापुर, जि. पुणे यांनी आमचे अशिलांबरोबर त्यांचे मालकीचे संपूर्ण मिळकतीचे साठेखत करून, खरेदी विक्रीचा व्यवहार निश्चित करून, त्याप्रमाणे लवकरच खरेदीखताचा दस्त आमचे अशिलाचे लाभात लिहून देण्याचे मान्य व कबुल केलेले आहे. व सदर मिळकतीबाबत विद्यमान मालकांनी कोणत्याही स्वरूपाचा अनोंदणीकृत दस्त केलेला नसल्याबाबत व सदरची मिळकत ही निर्वेध, निजोखमी असल्याची आमचे अशिलांस मिळकतींचे विद्यमान मालकांनी खात्री व भरवसा दिलेला होता व आहे. तरी सदरच्या मिळकतीबाबत कोणाचाही कोणत्याही प्रकारचा गहाण, दान, बक्षीस, लिज, वील, डिड, पोटगी, नोटरी करारनामा, तोंडीबोली, अगर अन्य कोणताही हक्क, हितसंबंध असल्यास या जाहीर नोटीसीचे प्रसिद्धी तारखेपासून खात (७) दिवसाचे आत कागदोपत्री पुराव्यानिशी हरकत घेवून आमचे अशिलांची खात्री पटवून द्यावी. मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास, सदरची मिळकत ही निर्वेध, निजोखमी, बोजारहीत आहे असे समजून तसेच कोणाचाही कोणताही हक्क, हितसंबंध असल्यास त्यांनी तो जाणीव पूर्वक सोडून दिला आहे असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व मग तद्नंतर कोणाचीही कोणतीही तक्रार, अगर हक्क, हितसंबंध आमचे अशिलांवर तसेच मिळकतीवर बंधनकारक राहणार नाही. कोणाचीही फसगत होवू नये म्हणून ही जाहीर नोटीस प्रसिद्ध केली आहे. कळावे.

परिशिष्ट : - मिळकतीचे वर्ण- जिल्हा तुकडी अहिल्यानगर पो. तु. ता. नगर पैकी अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील मौजे सावेडी येथील मिळकतींचे वर्णन खालीलप्रमाणे- सर्व्हे नंबे- १०/०३, प्लॉट नं. २२ अ, एकुण क्षेत्र १८५.८७ चौ. मी. यापैकी लिहून देणार यांचे हिस्याचे संपूर्ण मालकी हक्क, कब्जा वहिवाटीचे उत्तर बाजुकडील ९२.९३ चौ. मी. प्लॉट क्षेत्र. यांची चतु:सीमा- पूर्व- सामाईक रोड व दारकुंडे प्लॉट, दक्षिण- सर्व्हे नंबर पैकी प्रल्हाद शिनदे व लोखंडे यांचा प्लॉट, पश्चिम- बिज्जा यांचा प्लॉट, उत्तर- रोड. येणेप्रमाणे चतु:सीमापूर्वक वर्णनाची मिळकत वागणुकीचे व वहिवाटीचे हक्कासह काहीएक राखून न ठेवता असे.

**येणेप्रमाणे जाहीर नोटीस असे,** **सही/-**

**अहमदनगर** **ॲड. एस.एम. चौधरी**

**ता. २९/०६/२०२६** **अहिल्यानगर मो. ८३०८०३३२८६.**

# अण्णांनी देशहिता इतकीच आरोग्याची काळजी घेणे महत्त्वाचे - गोरख कल्हापुरे

## अण्णा यांच्या उपोषणास जन सेवा ड्रायव्हर पार्टीचा पाठिंबा



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** समाज आणि देशाच्या हितासाठी भ्रष्टाचाराच्या विरोधात असंख्य आंदोलने, उपोषणे केली ५ जुलै २०२६ रोजी अण्णा तुम्ही ९० व्या वर्षीही माहिती अधिकार दुरुस्ती कायद्याच्या विरोधात राळेगणसिद्धी येथे उपोषणास बसणार आहात, आपल्या या लोककल्याणकारी आंदोलनाला जनसेवा ड्रायव्हर पार्टी कडून जाहीर पाठिंबा देत आहोत,पण अण्णा देशहिता इतकीच आरोग्याची काळजी घेणे महत्त्वाचे वाटते असे जन सेवा ड्रायव्हर पार्टीचे महाराष्ट्र राज्य प्रदेश अध्यक्ष गोरख कल्हापुरे यांनी अण्णा हजारे यांच्या उपोषणास पाठिंबा दिलेल्या पत्रात म्हटले आहे.

राळेगण सिद्धी येथे जनसेवा ड्रायव्हर पार्टीच्या पदाधिकाऱ्यांनी अण्णा हजारे यांची भेट घेऊन पाठिंबा बाबतचे पत्र देऊन या उपोषणाबाबत सविस्तर चर्चा केली. यावेळी महाराष्ट्र राज्य प्रदेश अध्यक्ष गोरख कल्हापुरे उपाध्यक्ष गोरक्षनाथ कराळे, शहर जिल्हाध्यक्ष बाळासाहेब कोतकर, जिल्हा सचिव कैलास कोतकर, ट्रान्सपोर्ट ड्रायव्हर सेवा ट्रस्ट जिल्हाध्यक्ष दत्ता जाधव आदी उपस्थित होते.

ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी सर्वसामान्य नागरिकांच्या हातात असलेल्या माहिती अधिकाराचे रक्षण करण्यासाठी वयाच्या ९० व्या वर्षीही लढायला तयार झाले, हा आमचा देशवासियांसाठी तरुणांसाठी खूप मोठा आदर्श असल्याचे या चर्चेदरम्यान स्पष्ट करण्यात आले. यावेळी अण्णा म्हणाले आंदोलना दरम्यान आरोग्याला जर काही बाधा पोहचली,तर तुमच्यासारखी तरुणपिढी, देशातील सर्व सामान्य नागरिक यांचा पाठिंबा माझ्यामागे आहेच,त्यामुळे मला काही होणार नाही असे सकारात्मक विचार त्यांनी व्यक्त केले.

यावेळी गोरक्षनाथ कराळे म्हणाले तुमच्या आंदोलनाची सरकारने दखल घेतली नाही तर आम्ही जन सेवा ड्रायव्हर पार्टीच्या वतीने तुम्हाला बळ देण्यासाठी आणि सरकारच्या उदासीनतेच्या निषेध करण्यासाठी ठिकठिकाणी तीव्र रस्ता रोको आंदोलने करू. आपल्या उत्तम आरोग्यासाठी आम्ही ईश्वराला प्रार्थना करतो. तसेच आपले हे आंदोलन प्रशासनाला नमते घ्यायला भाग पाडेल असा देखील विश्वास आम्ही सर्वजण व्यक्त करतो. असे श्री कराळे यांनी स्पष्ट केले.

# आंतरराष्ट्रीय टॅलेंट ऑलिम्पियाडच्या विविध विषयातील परीक्षेत पोदार इंटरनॅशनल स्कूल अहिल्यानगरच्या विद्यार्थ्यांचे उल्लेखनीय यश

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी




**अहिल्यानगर–** आंतरराष्ट्रीय स्तरावरील आंतरराष्ट्रीय टॅलेंट ऑलिम्पियाड (राऊंड-२) च्या विविध विषयांच्या परीक्षेत पोदार इंटरनॅशनल स्कूल, अहिल्यानगरच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन करत शाळेच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला आहे. विविध देशांतील विद्यार्थ्यांच्या सहभागातून झालेल्या या स्पर्धात्मक परीक्षेत पोदारच्या विद्यार्थ्यांनी आपल्या बौद्धिक क्षमता, तार्किक विचारशक्ती आणि विषयांवरील प्रभुत्व सिद्ध करत राज्य, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर आपला ठसा उमटविला.

विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक कौशल्यांना चालना देणे, त्यांच्यातील विश्लेषण क्षमता, तर्कशक्ती आणि विषयांचे सखोल ज्ञान विकसित करणे हा आंतरराष्ट्रीय टॅलेंट ऑलिम्पियाड परीक्षेचा प्रमुख उद्देश आहे. या परीक्षेत पोदार इंटरनॅशनल स्कूलच्या विद्यार्थ्यांनी इंग्रजी, गणित, हिंदी आणि विज्ञान या विविध विषयांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करत उच्च गुणवत्ता प्राप्त केली.

इयत्ता पहिलीतील नितीन निरज मेश्राम याने राज्यात द्वितीय क्रमांक मिळवत रु. २,००० ची शिष्यवृत्ती प्राप्त केली. इयत्ता तिसरीतील वेदिका विकास कोरडे हिने राज्यात तृतीय क्रमांक मिळवत रु. १,२०० ची शिष्यवृत्ती पटकावली. तसेच इयत्ता तिसरीतील साईशा अमोल बागुल हिने राज्यात पाचवा क्रमांक मिळवत रु. १,००० ची शिष्यवृत्ती मिळवली.
याशिवाय, इयत्ता पहिलीतील सानवी जामोदकर आणि आराध्या तापरे यांनी झोनल स्तरावर स्थान मिळवत सुवर्णपदक (गोल्ड मेडल) आणि रु. १,००० चे गिफ्ट व्हाउचर प्राप्त केले. इयत्ता पहिलीतील अद्विक अदे तसेच इयत्ता तिसरीतील तनिष्का रेडगावकर यांनी प्रत्येकी रु. ५०० चे गिफ्ट व्हाउचर मिळवून उल्लेखनीय यश संपादन केले.

याचबरोबर शाळेतील अनेक विद्यार्थ्यांनी विविध विषयांमध्ये उच्च गुणवत्ता प्राप्त करत पदके मिळवली असून राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय क्रमवारीतही आपले स्थान निश्चित केले आहे. विद्यार्थ्यांच्या या यशामागे त्यांची सातत्यपूर्ण मेहनत, पालकांचे मोलाचे सहकार्य आणि शिक्षकांचे प्रभावी मार्गदर्शन हे महत्त्वाचे घटक ठरले.

विद्यार्थ्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल शाळेचे प्राचार्य मंगेश जगताप, उपप्राचार्य शगुफ्ता काझी, सीनियर ॲडमिन ऑफिसर आशुतोष नामदेव, ॲडमिन ऑफिसर नितीन गवांदे तसेच सर्व शिक्षकांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून भविष्यातही अशाच राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करण्यासाठी शुभेच्छा दिल्या.
विद्यार्थ्यांच्या या दैदिप्यमान यशामुळे संपूर्ण शाळेत आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून, या यशातून इतर विद्यार्थ्यांनाही शैक्षणिक उत्कृष्टतेकडे वाटचाल करण्याची नवी प्रेरणा मिळाली आहे. पोदार इंटरनॅशनल स्कूलने दर्जेदार शिक्षणाबरोबरच स्पर्धात्मक परीक्षांमध्ये विद्यार्थ्यांना सक्षम करण्याच्या आपल्या परंपरेला या यशातून पुन्हा एकदा अधोरेखित केले आहे.



माध्यमिक शिक्षक सोसायटीचे जेष्ठ संचालक व शिक्षक परिषदेचे जिल्हाध्यक्ष बाबासाहेब बोडखे यांची पंडित नेहरू हिन्दी विद्यालयाच्या मुख्याध्यापक पदी पदोन्नती झाल्यामुळे त्यांना शुभेच्छा देताना महाराष्ट्र राज्याचे शिक्षण उपसंचालक डॉ गणपतराव मोरे , शिक्षणाधिकारी श्रीम . संध्याताई गायकवाड मॅडम , डॉ .चव्हाण साहेब ,मुख्याध्यापक संघाचे जिल्हाध्यक्ष प्रा.सुनिल पंडीत , माध्यमिक शिक्षक सोसायटीचे चेअरमन प्रा. आप्पासाहेब शिंदे , प्रा दत्तापाटील नारळे , प्रा रमजान हावलदार , प्रा .दिलीप काटे आदि उपस्थित मान्यवर.

# वकृत्व स्पर्धेतून महापुरुषांचे विचार समाजासमोर प्रभावीपणे मांडता येतात - डॉ. राहुल पंडित

## पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या जन्म त्रिशताब्दी वर्षानिमित्त विचार भारती संस्थेच्या वतीने पालकमंत्री सांस्कृतिक महोत्सव व अहिल्यानगर गौरव दिनानिमित्त राज्यस्तरीय खुली वकृत्व स्पर्धा उत्साहात

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**अहिल्यानगर–** भारतीय संस्कृती ही जगातील सर्वांत प्राचीन, समृद्ध आणि विविधतेने नटलेली संस्कृती असून आज संपूर्ण जग भारतीय सांस्कृतिक वारशाचे अनुकरण करत आहे. वाचनातून व्यक्तिमत्त्व घडते, विचार परिपक्व होतात आणि प्रभावी वक्तृत्वातून समाजप्रबोधन घडते. महापुरुषांचा इतिहास, त्यांचे कार्य, विचार आणि भारतीय संस्कृतीचा गौरव समाजापर्यंत पोहोचविण्याचे प्रभावी माध्यम म्हणजे वक्तृत्व होय. विचार भारती संस्थेने राज्यस्तरीय खुल्या वकृत्व स्पर्धेच्या माध्यमातून युवकांना आपले विचार मांडण्यासाठी हक्काचे व्यासपीठ उपलब्ध करून दिले असून हा उपक्रम निश्चितच कौतुकास्पद आहे, असे प्रतिपादन प्रख्यात अस्थिरोग तज्ज्ञ डॉ. राहुल पंडित यांनी केले.

पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या जन्म त्रिशताब्दी वर्षानिमित्त तसेच पालकमंत्री सांस्कृतिक महोत्सव आणि अहिल्यानगर गौरव दिन निमित्त विचार भारती संस्थेच्या वतीने न्यू आर्ट कॉलेज येथे आयोजित राज्यस्तरीय खुल्या वकृत्व स्पर्धेचे उद्घाटन डॉ. राहुल पंडित यांच्या हस्ते उत्साहात संपन्न झाले.

यावेळी विचार भारती संस्थेचे राजाभाऊ मुळे, सचिव मनोज झंवर, माजी महापौर बाबासाहेब वाकळे, भाजपचे शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते, चंद्रकांत तागड, राजेंद्र मचे, पुष्कर कुलकर्णी, प्रा. अशोक सागडे, ऐश्वर्या सागडे, प्रा. संदीप कांबळे, प्रा. अनिल गर्जे, प्रा. राधाकिसन जोशी, प्रा. मच्छिंद्र माळुजकर यांच्यासह राज्यभरातून आलेले स्पर्धक, पालक आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी विचार भारती संस्थेचे सचिव मनोज झंवर म्हणाले की, पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या जन्म त्रिशताब्दी वर्षानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या या राज्यस्तरीय वकृत्व स्पर्धेच्या माध्यमातून त्यांच्या कार्याचा, दूरदृष्टीचा आणि लोककल्याणकारी प्रशासनाचा गौरव समाजासमोर आणण्याचे महत्त्वपूर्ण कार्य करण्यात आले आहे. महापुरुषांचे विचार आजच्या युवकांना ऊर्जा, प्रेरणा आणि योग्य दिशा देणारे आहेत. बदलत्या काळात युवकांमध्ये विचारांची देवाणघेवाण घडवून आणण्यासाठी, अभ्यासपूर्ण मांडणीची संधी उपलब्ध करून देण्यासाठी आणि समाजाभिमुख नेतृत्व घडविण्यासाठी अशा दर्जेदार वकृत्व स्पर्धांचे आयोजन ही काळाची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.
कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन प्रा. अशोक सागडे यांनी केले. कार्यक्रमाच्या प्रारंभी चंद्रकांत तागड यांनी प्रास्ताविकातून स्पर्धेची भूमिका, उद्दिष्टे आणि महोत्सवाची माहिती उपस्थितांसमोर मांडली, तर शेवटी पुष्कर कुलकर्णी यांनी उपस्थित मान्यवर, स्पर्धक, पालक आणि सर्व सहकाऱ्यांचे आभार मानले.

# आमदार विलास भुमरे यांच्या वाढदिवसानिमित्त जुने कावसान येथे वारकरी बांधवांना टाळ वाटप

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**पैठण–** कार्यक्षम आमदार विलास भुमरे यांच्या वाढदिवसानिमित्त विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात येत असून, त्याअंतर्गत जुने कावसान येथे वारकरी बांधवांना टाळ वाटपाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या उपक्रमामुळे वारकरी संप्रदायात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. मारुती महाराज कुरेकर वारकरी शिक्षण संस्था, जुने कावसान येथे हा कार्यक्रम पार पडणार असून, वारकरी परंपरेचे जतन व संवर्धन करण्याच्या उद्देशाने वारकरी बांधवांना टाळांचे वाटप करण्यात येणार आहे. या उपक्रमाचे आयोजन पंचायत समिती सदस्या सौ. सखूताई भारत झारगड व पुण्यश्लोक अहिल्यादेवी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. भारत झारगड यांच्या पुढाकाराने करण्यात आले आहे. यावेळी परिसरातील वारकरी, ग्रामस्थ, शिवसेना पदाधिकारी व कार्यकर्त्यांची उपस्थिती अपेक्षित आहे. आमदार विलास भुमरे यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या या सामाजिक व धार्मिक उपक्रमाचे परिसरातून स्वागत होत असून, वारकरी चळवळीला बळ देणारा हा उपक्रम ठरणार असल्याची भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली.

# दिलीप वाघ साई प्रेरणा गौरव पुरस्काराने सन्मानित



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**नेवासा–** सामाजिक व अध्यात्मिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या दिलीप वाघ यांना प्रतिष्ठेचा साई प्रेरणा गौरव २०२६ पुरस्काराने गौरविण्यात आले.

ओम साई विकास प्रतिष्ठान व बी.बी.सी. फिल्म प्रोडक्शन महाराष्ट्र राज्य यांच्या संयुक्त विद्यमाने साईच्या पवित्र भूमीत शिर्डी येथे हा राष्ट्रीय पातळीवरील पुरस्कार प्रदान करण्यात आले. रविवार, दि. २८ जून रोजी शिर्डी येथे प्रसिद्ध मराठी चित्रपट सृष्टीतील अभिनेत्री अलका कुबल यांच्या हस्ते दिलीप वाघ यांना सन्मानपत्र देऊन गौरवण्यात आले.

वाघ यांनी कला, अध्यात्मिक,क्रीडा, शैक्षणिक, सामाजिक,कामगार क्षेत्रात उत्कृष्ट कार्य केले आहे. त्यांच्या या अनमोल कार्याची दखल घेऊन त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे. या सोहळ्याचे आयोजन अध्यक्ष सुदाम संभारे, उपाध्यक्षा सौ. विद्या ठाकूर व सल्लागार डॉ. माधव किसन वानखेडे यांच्या नेतृत्वाखालील पुरस्कार सोहळा समितीने केले आहे.

(पान १ वरून)

## चौदा कोटींच्या फसवणूक प्रकरणी स्वप्नील शिंदेसह दोघांना अटक

आर्थिक गुन्हे शाखेकडे वर्ग झाल्यानंतर पोलीस निरीक्षक शरद गोरडे यानी तपासाची सूत्रे हाती घेतली. यापूर्वी नेवासा तालुक्यातील माजी सरपंच अमोल जाधव याला या गुन्ह्यात पोलिसांनी अटक केली होती. आज, मंगळवारी स्वप्नील शिंदे व त्याचा साथीदार महेश नारायण कु-हे या दोघांना आर्थिक गुन्हे शाखेने अटक केली. या गुन्ह्यात नाशिक कारागृहातून दोन्ही आरोपींना नगरच्या आर्थिक गुन्हे शाखेकडे वर्ग करण्यात आले आहे. दोघांना न्यायालयाने सात दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

## अहमदनगर मर्चंटस बँकेच्या चेअरमनपदी संजय चोपडा

यांची शुभेच्छापर समयोचित भाषणे झाली. बँकेचे नूतन चेअरमन संजय चोपडा यांनी आपल्या भाषणामध्ये सांगितले की, बँकेचे संस्थापक हस्तीमलजी मुनोत यांनी बँकेला ज्या प्रगतीपथावर नेले आहे तसेच बँकेचा नावलौकिक केलेला आहे. त्या नावलौकिकास मी कुठलाही तडा न जाऊ देता बँकेच्या नावलौकिकात अधिकाधिक भर घालीन. सदरचे पद हे काटेरी खुर्चीप्रमाणे आहे. सर्व संचालकांना सोबत घेऊन बँकेची प्रगती करील. हस्तीमलजी मुनोत यांचे जे स्वप्न आहे, की सभासदांना रक्कम रुपये ५,१००/- ची मुदत ठेव पावती देण्याचा, यासाठी मी पाठपुरावा करून प्रस्ताव मंजूर करीत हस्तीमलजी मुनोत यांच्या हस्ते ठेव पावतीचे वितरण करण्यात येईल.

बँकेचे संस्थापक व मावळते चेअरमन हस्तीमलजी मुनोत यांनी आपल्या भाषणात मी बँकेच्या ज्या प्रगतीचे स्वप्न पाहिलेले आहे त्याच प्रकारे बँकेची प्रगती होत असून नूतन चेअरमन संजय चोपडा हे चेअरमन पदाची कामगिरी अत्यंत उत्कृष्टरित्या पार पाडतील असा विश्वास व्यक्त करून त्यांच्या पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.
निवडणूक अधिकारी गणेश ओटी यांचा बँकेच्या वतीने यथोचित सत्कार करण्यात आला.
संजय चोपडा यांच्या निवडीबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे. बँकेच्या बाहेर मित्र परिवाराच्या वतीने ढोल-ताशांच्या गजरात त्यांचे अभिनंदन करण्यात आले.

## श्रीगोंद्यात आलिशान कारमधून गुटख्याची वाहतूक

पोलिसांनी घटनास्थळावरून अमोल रामदास जाधव (वय ३५), अनिल रतन कुरुमकर (वय ४३) आणि फरहान रेहमान बेपारी (वय २३, सर्व रा. श्रीगोंदा) या तिघांना ताब्यात घेतले. मुख्य आरोपी अमोल जाधव याने हा व्यवसाय दीपक लोखंडे (रा. लोखंडेवाडी) याच्यासोबत भागीदारीत सुरू असल्याचे सांगितले. हा माल त्यांनी सांगली जिल्ह्यातील जत येथून अप्पू आणि माजीद यांच्याकडून खरेदी केला होता, तर फरहान बेपारी हा शोयेब राजू तांबोळी याच्या सांगण्यावरून माल नेत होता. या प्रकरणातील दीपक लोखंडे, अप्पू, माजीद आणि शोयेब तांबोळी हे चार आरोपी सध्या फरार आहेत.या कारवाई ६ लाख ३ हजार २०० रुपयांचा गुटखा व सुगंधित तंबाखू, २२ लाख रुपये किमतीच्या दोन आलिशान कार, ३० हजार १३० रुपये रोख व ५५ हजार रुपये किमतीचे तीन मोबाईल असा २८ लाख ८८ हजार ३३० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.
या प्रकरणी पोलीस अंमलदार मनोज साखरे यांच्या फिर्यादीवरून श्रीगोंदा पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहितेचे कलम १२३, २२३, २७४, २७५, ३(५) आणि अन्न सुरक्षा मानके कायदा २००६ चे कलम ५९ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
कारवाईत यांचा सहभाग
ही कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या मार्गदर्शनाखाली एलसीबीचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे तसेच तपास पथकातील उपनिरीक्षक अनंत सालगुडे, पोलीस अंमलदार अतुल लोटके, गणेश धोत्रे, शाहिद शेख, मनोज साखरे, प्रशांत राठोड आणि चंद्रकांत कुसळकर यांच्या पथकाने केली.

## राहुरी-शनिशिंगणापूर रेल्वेप्रश्न केंद्रस्थरावर सोडवणार - फडणवीस

नेतृत्वाखाली केंद्र सरकारकडे पाठपुरावा करणार असल्याचे मंत्री विखे पाटील म्हणाले.
राहुरी शनिशिंगणापूर रेल्वे मार्गाच्या संदर्भात असलेल्या या रेल्वे मार्गाच्या बाबतीत बैठकीत चर्चा झाली.या प्रश्नाबाबत शेतकर्याच्या असलेल्या भावना मुख्यमंत्र्याच्या निदर्शानास आणून देणार असल्याचे मंत्री विखे पाटील म्हणाले. माजी मंत्री आ.दिलीप वळसे पाटील यांनी बैठकीत सहभाग घेताना सांगितले की,पुणे नासिक रेल्वे प्रकल्पाच्या संददर्भात केंद्रीय रेल्वे मंत्री आश्विनी वैष्णव यांच्याशी चर्चा केली असून जीएमआरटीच्या अडचणी दूर होवू शकतात ही बाब त्यांच्या निदर्शानास आणून दिली आहे.काही देशांमध्ये आशा पध्दतीच्या अडचणी असताना रेल्वे मार्गाची काम झाली असल्याचा दाखला देवून यासाठी केंद्र सरकारकडे पाठपुरावा करावा लागेल.मुख्यमंत्र्याच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळ नेण्याची सूचना त्यांनी केली.

## केडगावात तलवार बाळगणारा जेरबंद

आरोपीविरुद्ध कोतवाली पोलीस ठाण्यात भारतीय हत्यार कायदा कलम ४/२५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस हवालदार राहुल शिंदे करत आहेत.